# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION**

बँक ऑफ इंडिया इमारत, 3 रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई 400001 2267 0210 /148 /248,22602222 फॅक्स : 22673915

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 2267 0210 /148 /248, 22602222 Fax : 22673915

**ई-मेल** - sec_mpsc@maharashtra.gov.in **वेबसाईट** - www.mpsc.gov.in, www.mpsconline.gov.in


## गृहरक्षक, गट ब, सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था,सामान्य प्रशासन विभाग

**धारिका क्रमांक :२२४९/६६५/दहा** **जाहिरात क्रमांक २०११/१६० :**

आयोगामार्फत सामान्य प्रशासन विभाग यांच्या आस्थापनेवर गृहरक्षक, गट ब, सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्थाच्या एका जागेसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत .या पदासाठी अर्हताप्राप्त असलेले उमेदवार अर्ज करू शकतात.

**२. उपलब्ध पदसंख्या** :-

| एकूण पदसंख्या | अमागास |
|---|---|
| १ | १ |

२.१ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. संकीर्ण २०१०/प्र.क्र.३५५/का.२८, दिनांक१३/१/२०११ . तसेच शासन निर्णय क्र. न्यायाप्र/२००९/प्र. क्र.९/सुधार -३ दि.१३ ऑगस्ट २००९ च्या अनुषंगाने खालील अपंगत्व असलेले उमेदवार प्रस्तुत पदासाठी पात्र आहेत :

| शारिरीक योग्यता | सुयोग्य पदासाठी अपंगत्वाचा संवर्ग |
|---|---|
| S,RW,W,ST,BN,MF | Blindness or low vision |
| S-Sitting,RW-Reading and Writing, | Hearing impairment |
| W-Walking,ST-Standing,BN- Bending, MF- Manipulation by Fingers | Locomotor disability or cerebral palsy |

२.२ वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सुचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**३. वेतनश्रेणी** : **पीबी**-२- ९३००-३४८०० + **ग्रेड वेतन** – ४४००/-

**४. पात्रता-**

४.१ वय- दिनांक १मार्च, **२०१२** रोजी ५२ वर्षापेक्षा जास्त नसावे.

४.२. शैक्षणिक अर्हता - व अनुभव - १) एस.एस.सी. किंवा तत्सम अर्हता आणि २) भूदलात नायब सुभेदार, सुभेदार, किंवा सुभेदार मेजर दर्जापेक्षा कमी नसेल अशा पदावर किंवा नाविक दलात अथवा वायुदलात समकक्ष दर्जाच्या पदावर सेवा केलेले माजी सैनिक. ३) संरक्षण दलातील एज्युकेशन कोअर किंवा तत्सम शैक्षणिक संस्थेत निर्देशक म्हणून अनुभव असलेल्या आणि/किंवा खेळ व क्रिडा यामध्ये प्राविण्य असलेल्या किंवा लेखा विषयक कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारास पसंतीक्रम देण्यात येईल.

५. प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरीता पात्र असणार नाही जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या वाजवी . आणि अर्ज सादर केलेल्य प्रमाणापेक्षा जास्त असेल सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणिअथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक / अनुभव याच्या आधारे निकष निश्चित करुन अथवा चाळणी परीक्षेद्वार/अर्हता मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईलचाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास ., अर्हता आणि चाळणी .अथवा अनुभव शिथील केला जाणार नाही / परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.

६. कर्तव्ये व जबाबदा-याः- प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदा या याबाबतचा तपशील आयोगाच्या-www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

७. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहेअर्ज करण्याची पध्दत ., आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क,निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावेआयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली . माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

८. **शुल्क** : (१) अमागासवर्गीय ४१० .रु -/- (मागासवर्गीय - रू. २१०) (२) सदर शुल्क ऑनलाईन अर्जाची नोंदणी केल्यावर प्राप्त होणा .या विहित चलनाद्वारे भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन वेळेत रोखीने भरावे लागेल-(३) बँकेमध्ये रक्कम भरल्यानंतर बँकेकडून चलनावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या Transaction ID ची नोंद पुन्हा ऑनलाईन पध्दतीने अचूकरित्या केल्याशिवाय अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होत नाही .

९. **अर्ज करण्याची पध्दत** :- (१) प्रस्तुत भरतीसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येतीलइतर कोणत्याही प्रकारे अर्ज . .स्वीकारण्यात येणार नाहीत(२)पात्र उमेदवाराला वेबबे-स्ड )Web-based) ऑनलाईन अर्ज www.mpsconline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक २ नोव्हेंबर, २०११ ते दिनांक ३० नोव्हेंबर, २०११** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील .

(३) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या **www.mpsconline.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत) तसेच ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याचे प्रात्यक्षिक .Demo) सदर वेबसाईटवर पाहता येईल.(४) विहित पध्दतीने दोन्ही टप्प्यांतील अर्ज सादर करण्याची केल्यानंतर ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे व परीक्षा शुल्क बँकेत जमा)Transaction ID नोंदविणे( संपूर्ण कार्यवाही आयोगाने विहित केलेल्या कालावधीतच पूर्ण करणे आवश्यक आहे (५) बँकेमध्ये रकमेचा भरणा केल्यानंतर शासकीय कार्यालयीन कामकाजाच्या दोन दिवसानंतर विहित पध्दतीने Transaction ID अचूकपणे नोंदवावा. बँकेकडून प्राप्त झालेल्या Transaction ID ची नोंद अचूकपणे करण्यात आली असेल तरच पुढील प्रक्रिया करता येईल.

१०. विहित पद्धतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्यासाठी **चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक ३० नोव्हेंबर, २०११ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे**. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल. तसेच **चलनाद्वारे विहीत शुल्क बँकेमध्ये दिनाक १ डिसेंबर, २०११ पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे आवश्यक राहील.**

११.चलनाद्वारे शुल्क बॅकेमध्ये भरल्यानंतर **बँकेकडून प्राप्त होणारा Transaction ID दिनाक ४ डिसेंबर, २०११ रोजी २३.५९ वाजेपर्यंत अचूकपणे नोंदविणे आवश्यक आहे** त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

१२. आयोगाने विहित केलेल्या पध्दतीनुसार Transaction ID ची नोंद अचूकरित्या, विहित पध्दतीने व विहित कालावधीत न करणा-या उमेदवारांचा अर्ज स्वीकारला जाणार नाही.

**ठिकाण : मुंबई** — **नि.श.पटवर्धन**

**दिनांक : २ नोव्हेंबर, २०११** — **उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.**

*************

**गृहरक्षक (वर्ग - २)**
**कर्तव्ये व जबाबदा-या**

१) **संचालकांच्या आदेशानुसार संस्थेच्या वसतीगृहाचे व्यवस्थापन पाहणे व मुलांना भोजन व निवासाची सुविधा उपलब्ध करून देणे.**

२) **संचालकांनी मान्यता दिलेल्या विद्यार्थ्यांच्या बौध्दिक व शारिरीक प्रगतीवर लक्ष ठेवणे.**

३) **विद्यार्थ्यांच्या दैनंदिन अभ्यासावर लक्ष ठेवणे व त्यांच्या अडचणी सोडविणे.**

४) **आजारी विद्यार्थ्यांना तातडीने वैद्यकीय मदत पुरविणे व त्यांच्या आरोग्याकडे लक्ष ठेवणे.**

५) **संस्थेच्या वसतीगृहातील मुलांमध्ये शिस्त स्थापना करणे व त्यांची अंमलबजावणी करणे.**

६) **संस्थेच्या भोजनगृहातील लागणारा किराणा, भाजी इ. वस्तुंची खरेदी करणे व त्यांचे हिशोब ठेवणे.**

७) **संस्थेसाठी खरेदी केलेल्या वस्तुंच्या उपयोगावर नियंत्रण ठेवणे. मासिक भांडार पडताळणी प्रक्रिया राबविणे.**